Indian Academy of Pediatrics (IAP)

महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## प्रकरण ८८ :

# वारंवार मूत्रमार्गात संसर्ग होणाऱ्या मुलाची काळजी कशी घ्यावी?

लहान मुलांमध्ये मूत्रमार्गात जंतू संसर्ग झाल्यास त्याकडे पाहण्याचा वैद्यकीय दृष्टिकोन वेगळा असतो. याचे कारण त्यात कोणतेतरी शल्यचिकित्सेशी संबंधित कारण असू शकते. तेव्हा वरचेवर मूत्रसंसर्ग झाल्यास त्याकडे गंभीरतेने पाहणे गरजेचे असते


अध्यक्ष २०२३ : डॉ. रमाकांत पाटील

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गन्गोलीया

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

अनुवादक : डॉ. उज्वला गवळी

पुनरावलोकन : डॉ. चित्रा दाभोळकर, डॉ. नरेंद्र नानिवडेकर, अविनाश शिरगावकर

*Convener:* **Anil Vasudevan**

*Members:* **Daruru Ranganath, Tathagata Bose, Ranjit Theragaonkar**

*Reviewer:* **P Anil Kumar**




## वारंवार मूत्रमार्गात संसर्ग होणाऱ्या मुलाची काळजी कशी घ्यावी याबद्दल वारंवार विचारले जाणारे १० प्रश्न

१. मूत्रमार्गात होणारा संसर्ग म्हणजे काय आणि वारंवार होणारा मूत्रमार्गातील संसर्ग म्हणजे काय?

२. माझ्या मुलाला मूत्रमार्गातील संसर्ग झाला आहे की नाही हे मला कसे कळेल?

३. माझ्या मुलाला वारंवार मूत्रमार्गातीलसंसर्ग होण्याची शक्यता आहे का?

४. माझ्या मुलाला मूत्रमार्गातील संसर्ग आहे हे मला कसे कळेल?

५. मूत्रमार्गातील संसर्गाचा उपचार केव्हा आणि कसा करावा?

६. माझ्या मुलाला वारंवार मूत्रमार्गातील संसर्ग असल्यास डॉक्टर कोणत्या चाचण्या करायला सांगतील?

७. माझ्या मुलांमध्ये वारंवार होणारा मूत्रमार्गातील संसर्ग टाळण्यासाठी मी काय करू?

८. माझ्या मुलाला वारंवार मूत्रमार्गातील संसर्ग असल्यास त्यांची सुंता करणे आवश्यक आहे का?

९. वारंवार होणाऱ्या मूत्रमार्गातील संसर्गाला क्रॅनबेरीचा रस किंवा प्रोबायोटिक प्रतिबंध करतात का?

१०. वारंवार होणाऱ्या मूत्रमार्गातील संसर्गामुळे माझ्या मुलाच्या मूत्रपिंडाला इजा होईल का किंवा ते निकामी होण्याची शक्यता आहे का? डॉक्टरांकडे कशी फेर तपासणी करणे आवश्यक आहे?


**Under the Auspices of the IAP Action Plan 2020–2021**

**Piyush Gupta** IAP President 2021

**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** IAP President 2020

**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021

**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

८८


# वारंवार मूत्रमार्गात संसर्ग होणाऱ्या मुलाची काळजी कशी घ्यावी?

प्रश्न (१)

## मूत्रमार्गात होणारा संसर्ग म्हणजे काय आणि वारंवार होणारा मूत्रमार्गातील संसर्ग म्हणजे काय?

मूत्रपिंड मूत्र (लघवी) बनवते आणि मूत्राशयात ते साठते. मूत्रमार्गातून ते मूत्रपिंडापासून मूत्राशयात जाते आणि मूत्रसर्गिकेतून शरीराबाहेर टाकले जाते. मूत्रपिंड (kidney), मूत्रमार्ग (ureter), मूत्राशय (bladder), बाह्यमूत्रमार्ग किंवा मूत्रसर्गिका (urethra) हे मूत्रमार्गाचे विविध भाग आहेत. **(चित्र १)** जेव्हा एखाद्या मुलामध्ये विशिष्ट लक्षणे असतात आणि लघवीमधे जिवाणूंची वाढ दिसून येते तेव्हा मूत्रमार्गाचा संसर्ग ही संज्ञा वापरली जाते. सामान्यतः एकाच प्रकारचे जंतू जननेंद्रियाच्या आसपासच्या त्वचेतून किंवा शरीराच्या इतर भागातून रक्त प्रवाहाद्वारे मूत्रमार्गात किंवा मूत्रपिंडात प्रवेश करतात. मुलांपेक्षा मुलींमध्ये मूत्रमार्गात होणारा संसर्ग अधिक आढळतो. मुलींचा मूत्रमार्ग लहान असतो त्यामुळे जीवाणू सहजपणे मूत्राशयात प्रवेश करू शकतात. जेव्हा एखाद्या मुलाला एकापेक्षा जास्तवेळा मूत्रमार्गातील संसर्गाचा त्रास झालेला असेल तेव्हा आम्ही वारंवार होणारा मूत्रमार्गातील संसर्ग अशी संज्ञा वापरतो.

मूत्रमार्गातील संसर्ग असलेल्या मुलांनी डॉक्टरांकडे उपचारासाठी जाणे आवश्यक आहे आणि वारंवार होणारा मूत्रमार्गातील संसर्ग हे संक्रमण आपणहून बरे होत नाही. लघवीच्या संसर्गाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी योग्य ते उपचार करण्याची गरज असते.




चित्र १ : मूत्रपिंड आणि मूत्रमार्ग

प्रश्न (२)

## माझ्या मुलाला मूत्रमार्गातील संसर्ग झाला आहे की नाही हे मला कसे कळेल?

बहुतेक मूत्रमार्गातील संसर्ग मूत्रमार्गाच्या खालच्या भागात होतात. मूत्राशयाचा संसर्ग म्हणजेच मूत्र साठवून ठेवणाऱ्या इंद्रीयाचा संसर्ग म्हणजे सिस्टाइटिस. मूत्रसर्गिकेचा संसर्ग (मूत्राशयातून मूत्र शरीराबाहेर वाहून नेणारी नळी) म्हणजे युरेथ्रायटीस. लहान मुलांमध्ये हा संसर्ग मुत्रनलिकेतून मूत्रपिंडापर्यंत जातो. त्यास पायलोनेफ्रायटिस किंवा मूत्रपिंड संसर्ग असे म्हणतात.

लहान मुलाला मूत्रमार्गातील संसर्ग आहे की नाही हे सांगणे कठीण असते. कारण लक्षणे असंदिग्ध असतात आणि लहान मुले त्यांना काय होत आहे हे सहजपणे संवाद साधून आपल्याला समजावून सांगू शकत नाहीत.

मूत्रमार्गातील संसर्गाची विशिष्ट लक्षणे खालील प्रमाणे आहेत.

- ताप १०१$^{0}$ फॅरनहाईट किंवा ३८.३$^{0}$ से. डिग्रीपेक्षा जास्त ताप आणि इतर कोणतीही लक्षणे नसलेल्या मुलाला ताप येत असेल तर २० पैकी एका मुलाला मूत्रमार्गातील संसर्ग असू शकतो.
- लघवी करताना वेदना किंवा जळजळ होणे. लघवी करताना जास्त रडणे.
- वारंवार लघवी करण्याची तीव्र इच्छा होणे किंवा जरी लघवी कमी प्रमाणात होत असली तरी लघवी करायला जावेसे वाटणे, लघवीला जाण्यासाठी रात्री खूप जागरण करणे.
- जे मूलपूर्वी अंथरुणात लघवी  करत नव्हते ते अंथरुणात लघवी करू लागणे.
- पोटाच्या खालच्या भागातील पोटदुखी.
- लघवीला दुर्गंधीयुक्त वास किंवा लघवी गढूळ होणे, लघवीमध्ये रक्त पडणे.
- विनाकारण चिडचिड, उलट्या, जुलाब, भूक मंदावणे, वजन वाढणे, कावीळ.

मूत्रपिंडामधील जीवाणू संसर्ग' (Pyelonephritis) ही मुलांमधील गंभीर समस्या आहे.  यामधे वर दिलेली अनेक लक्षणे उद्भवतात. या आजारात मूल जास्त आजारी दिसते, थंडी वाजून खूप ताप येणे, पाठ दुखणे किंवा पाठीत एका बाजूला तीव्र वेदना होणे खूप थकवा येणे, किंवा उलट्या होणे यासारखी लक्षणे आढळतात.

प्रश्न (३)

## माझ्या मुलाला वारंवार मूत्रमार्गातील संसर्ग होण्याची शक्यता आहे का?

निरोगी मुलाच्या मूत्रमार्गात मूत्रमार्गातील संसर्गा विरुद्ध अनेक संरक्षण यंत्रणा असतात. यात मूत्रपिंडातून मूत्राशयात लघवीचा प्रवाह सुरळीत असणे आणि मूत्राशय नियमितपणे रिकामे होणे समाविष्ट असते.

खालील समस्या असलेल्या मुलांना वारंवार होणाऱ्या मूत्रमार्गातील संसर्गाचा त्रास होण्याची अधिक शक्यता असते.

- जन्मत:च मूत्रपिंड आणि मूत्रमार्गामध्ये व्यंग, मूत्रमार्ग अरुंद असणे किंवा मार्ग आकुंचित (stricture) असणे, किंवा मूत्रसर्गिकेत झडप असणे (posterior urethral valve); मूत्राशयामध्ये व्यंग, मूत्राशयामध्ये लघवीची साठवण आणि रिकामे करण्यासाठी नियंत्रित करणाऱ्या मज्जातंतूंमध्ये बिघाड (neurogenic bladder).
- मूत्राशयातून मूत्रनलिकेत आणि मूत्रपिंडाकडे मूत्राचा असामान्य उलटा प्रवाह वाहतो याला व्हझायकोयुरेटरल रिफ्लक्स (VUR) असे म्हणतात. मूत्रमार्गातील संसर्ग असलेल्या अनेक मुलांमध्ये हे आढळून येते.
- शौचा बाबतीत अयोग्य सवयी आणि शारीरिक अस्वच्छता.
- मूत्राशय आणि आतड्यांचे बिघडलेले कार्य (Bladder Bowel Dysfunction). हा असा एक आजार आहे ज्यामध्ये मूत्राशय आणि आतडे या अवयवांमध्ये किंवा त्याच्या मज्जातंतू पुरवठ्यामध्ये कोणतीही समस्या नसतानादेखील त्यांचे कार्य सुरळीत चालत नाही. मुलाला लघवी करण्याची तीव्र इच्छा झाली तरी ते लघवी धरून ठेवतात. ह्यात बद्धकोष्ठतादेखील असू शकते. काही वेळेला मोठ्या आतड्यांचा काही भाग फुगतो आणि मूत्राशयावर दाब येतो आणि ते रिकामे होऊ शकत नाही.

प्रश्न (४)


## माझ्या मुलाला मूत्रमार्गातील संसर्ग आहे हे मला कसे कळेल?

मूत्रमार्गातील संसर्गाचे लवकर निदान करणे महत्त्वाचे आहे. लवकर निदान न झाल्यास किंवा उपचार न केल्यास मूत्रमार्गातील संसर्गामुळे मूत्रपिंडाचे नुकसान होऊ शकते. मूत्रमार्गातील संसर्गाचे निदान करण्यासाठी डॉक्टरांनी वर्णन केलेली लक्षणे आढळल्यास मूत्रमार्गातील समस्यांबद्दल डॉक्टर विचारतील त्याप्रमाणे त्यांना त्याची कल्पना द्यावी. बालरोगतज्ञ संसर्गाच्या तीव्रतेचे मूल्यांकन करून संभाव्य कारण ओळखण्यासाठी शारिरिक तपासणी करतील आणि चाचणीसाठी मूत्राचा नमुना घेतील.

सूक्ष्म दर्शकाखाली सूक्ष्मजंतू किंवा पू यासाठी लघवी तपासून बघतील. आणि लघवीचे ‘कल्चर’ म्हणजे प्रयोगशाळेत लघवीतील जीवाणू वाढविण्यासाठी केलेली चाचणी करून मूत्रमार्गातील संसर्गाचे निदान करण्यास मदत करते.

**लघवीच्या तपासणीसाठी नमुना कसा घ्यावा याविषयी सूचना**

- लहान मुलांकडून लघवीचा नमुना गोळा करणे कठीण असते. विशेषत: लहान मुलांमध्ये नमुना कसा घेतला जातो हे मुलाच्या वयावर अवलंबून असते. **(चित्र २)**
- मोठ्या मुलांमध्ये प्रयोगशाळेने दिलेल्या निर्जंतुक बाटलीत किंवा छोट्या डबीमध्ये लघवी करून नमुना घ्यायला सांगितले जाते, बाटलीच्या तोंडाच्याकडेला स्पर्श होणार नाही याची खात्री करावी कारण याचा परिणाम रिपोर्टवर होऊ शकतो. बाळाला लघवी करण्यास प्रवृत्त करण्यासाठी थंड पाण्यात भिजवलेल्या कापसाचा तुकडा वापरून किंवा मुलाच्या खालच्या पोटाला काही मिनिटे हलक्या हाताने दाबून लघवी जमा करता येते.
- लहान मुलांमध्ये लघवी करताना बाटली लघवीच्या प्रवाहात धरून मूत्र गोळा करावे लागते. काही वेळेस लघवी जमा करण्यास त्रास होऊ शकतो. अशा परिस्थितीत मूत्राशयापर्यंत मुलाच्या मूत्रमार्गात कॅथेटर नावाची छोटी पातळ निर्जंतुक प्लास्टिकची नळी टाकून स्वच्छ मूत्र नमुना मिळवता येतो.




चित्र २: लहान मुलांमध्ये स्वच्छ लघवीचा नमुना गोळा करणे.

प्रश्न (५)

## मूत्रमार्गातील जंतु संसर्गाचा उपचार केव्हा आणि कसा करावा?

जन्तुसंसर्गासाठी योग्य डोसमध्ये योग्य प्रति जैविकांनी (Antibiotics) उपचार केला जातो. सामान्यता लघवी चाचणीतून नमुना प्राप्त झाल्यानंतर, प्रतिजैविक उपचार सुरू केले जातात. प्रतिजैविक सुरू केल्यानंतर दोन ते तीन दिवसात लक्षणे सुधारली पाहिजे. तोंडावाटे प्रतिजैविक उपचार दिले जातात. खालील परिस्थितीत हॉस्पिटलमधे भरती करून शिरेतून प्रतिजैविक वापरली जातात:

- बाळाला उलट्या होणे
- आहार कमी घेणे, मुल जास्त आजारी दिसणे किंवा मूत्रपिंड संसर्ग झाल्याची लक्षणे जाणवतात त्यावेळी लहान मुलाला ऍडमिट करण्याची गरज असते.
- लहान बाळ सहा महिन्यांपेक्षा कमी असल्यास.
- तोंडावाटे प्रतिजैविक उपचारानंतर ४८ ते ७२ तासानंतर मुलाच्या लक्षणांमध्ये कोणतीही सुधारणा होत नसल्यास.

संक्रमित मूत्रमार्गातील जिवाणू रक्तामध्ये पसरले असतील म्हणजे युरोसेप्सीस. तुमच्या मुलाला बरे वाटत असेल तरीही डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधांचा कोर्स पूर्ण करा. प्रतिजैविकांचा कोर्स पूर्ण केल्यानंतर तुमचे डॉक्टर संक्रमण निघून गेल्याची खात्री करण्याकरता मूत्र तपासणी पुन्हा करतील. पूर्ण उपचार न केल्यास मूत्रमार्गातील जंतुसंसर्ग परत होऊ शकतो आणि तो अधिक पसरू शकतो.

इतर उपचारांमध्ये : भरपूर पातळ पदार्थांचे सेवन करणे. तापावर योग्य डोस मध्ये पॅरासिटोमॉल औषधे घेणे आवश्यक आहे. लघवीला अल्कली धर्म बनवणारी औषध वापरण्याची गरज नाही.

जर खालीलपैकी काही आढळल्यास तुमच्या डॉक्टरांना ताबडतोब भेटा किंवा कॉल करा :

- तुमच्या मुलाला मूत्रमार्गातील जंतुसंसर्गाचे निदान झाले आहे आणि प्रतिजैविके घेतल्यानंतर दोन दिवसांनी सुधारणा होत नाही.
- प्रतिजैविके घेण्यास त्रास होत आहे किंवा उलट्या होत असल्यास.
- पुरेसे पातळ पदार्थ घेत नसल्यास, पाठदुखी जास्त वाढल्यास.
- कोणतीही चिंता असल्यास डॉक्टरांशी संपर्क साधा.

प्रश्न (६)

## माझ्या मुलाला वारंवार यूटीआय असल्यास डॉक्टर कोणत्या चाचण्या करायला सांगतील?

तुमच्या मुलाला मूत्रमार्गात संसर्ग कारणीभूत असलेल्या कोणत्याही समस्या तपासण्यासाठी तुमचे डॉक्टर मूत्रपिंड किंवा मूत्राशय अल्ट्रासोनॉग्रफी करण्यासाठी सांगतील. अल्ट्रा सोनोग्राफीव्यतिरिक्त मूत्रमार्ग सामान्यपणे कार्य करत आहे आणि कोणत्याही नुकसानीपासून मुक्त आहे याची खात्री करण्यासाठी अतिरिक्त चाचणी करून घेण्यास सल्ला देऊ शकतात. या चाचण्यांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे

मिकचुरेटिंग सिस्टोयुरेथ्रोग्राफी (MCU) :

- व्हेसीको युरेटरीक रिफ्लक्स आणि मूत्राशयातील विकृतींचे मूल्यांकन करण्यासाठी एक विशेष प्रक्रिया. या प्रक्रियेत मूत्राशयात एक नळी सोडली जाते कॉन्ट्रास्ट सामग्रीने भरलेले जाते जे एक्स–रेमध्ये दिसतो आणि मुलाला लघवी करण्याची सूचना दिली जाते. एक्स–रे काढला जातो. मूत्रमार्गात लघवीचा उलटा जाणारा प्रवाह (बॅक फ्लो) शोधण्यासाठी तसेच पुरुष मुलांमध्ये मूत्रमार्गातील कोणताही अडथळा शोधण्यासाठी ही तपासणी करतात.
- न्यूक्लिअर स्कॅन : मूत्रपिंड सामान्य आहे की नाही हे पाहण्यासाठी किरणोत्सर्गी सामग्री शिरामध्ये टोचली जाते. अनेक प्रकारचे न्यूक्लियर स्कॅन आहेत. प्रत्येक मूत्रपिंड आणि मूत्राशयाबद्दल वेगवेगळी माहिती देतात. किरणोत्सर्गी सामग्री इतर कोणत्याही प्रकारच्या किरणांपेक्षा जास्त रेडिएशन देत नाही.


वर नमूद केलेल्या बऱ्याच प्रक्रियेसाठी करण्याच्या तपासण्या बदलल्या जाऊ शकतात. कोणत्या चाचण्या करायच्या हे तुम्ही तुमच्या डॉक्टरांशी चर्चा करणे योग्य.

प्रश्न
(७)

## मुलाला वारंवार होणाऱ्या मूत्रमार्गातील जंतुसंसर्ग टाळण्यासाठी मी पालक म्हणून काय करू शकतो?

पालक म्हणून तुम्ही हे करू शकता **(चित्र ३)**

- तुमचे मूल पुरेसे पाणी पिते का याची खात्री करा.
- तुमच्या मुलाला नियमितपणे लघवी आणि शौचास जाण्यास प्रोत्साहित करा आणि दिवसभरात दर ३ ते ४ तासाने किंवा झोपण्यापूर्वी लघवीला जाण्यास सांगा.
- तुमच्या मुलाला शौचालयाचा वापर करण्यास सांगा आणि लघवी करण्यास टाळाटाळ करू देऊ नका. शौचालय जरी स्वच्छ नसले तरी लघवी करणे थांबवू नये. त्याचा वापर करणे योग्य आहे. अस्वच्छ शौचालयामुळे मूत्रमार्गातील जंतुसंसर्ग होत नाही.
- तुमच्या मुलीला तिची जननेंद्रिये स्वच्छ ठेवण्यास शिकवा. दूषित होण्यापासून रोखण्यासाठी स्वच्छता ही समोरून मागे असायला हवी.
- आहारात पुरेसा चोथा, पुरेसे द्रव्य पदार्थ, नियमित व्यायाम आणि शौचालयाच्या चांगल्या सवयींची खात्री करून बद्धकोष्ठता टाळा. शौचालय प्रशिक्षणानंतरही तुमच्या मुलांमध्ये दिवसा अंतर्वस्त्र ओले होणे, वारंवार शौचालयात जाणे किंवा लघवी करताना घाई होणे, लघवी करणे टाळण्यासाठी हात किंवा पायांनी मांडीचा भाग दाबणे, शौचालयात जाणे वेदना होणे किंवा लघवी करताना प्रवाहात अडथळा येणे, ह्या सारखी लक्षणे आढळल्यास बीबीडीबाबत तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- डॉक्टरांनी संसर्ग टाळण्यासाठी प्रति जैविकाचा एकच डोस दररोज लिहून दिला असेल तर डोस चुकू नका.
- चांगल्या दर्जाचा डायपर वापरा. स्वच्छ कॉटन नॅपीज वापरता येतील आणि त्याही वारंवार बदला.




चित्र ३ : मुलांमध्ये मूत्रमार्गाचा संसर्ग टाळणे

## प्रश्न (८)

### माझ्या मुलाला वारंवार मूत्रमार्गातील जंतुसंसर्ग असल्यास त्यांची सुंता करणे आवश्यक आहे का?

सुंता झालेल्या मुलांमध्ये मूत्रमार्गातील जंतुसंसर्गाचे प्रमाण कमी असते. तथापि मोठ्या मुलांमध्ये सुंता केल्यामुळे मूत्रमार्गातील जंतुसंसर्ग होत नाही हा फायदा आहे की नाही हे स्पष्ट नाही. वारंवार मूत्रमार्गातील जंतुसंसर्ग आणि VUR असलेल्या मोठ्या मुलांमध्ये सूंता केल्यामुळे जंतुसंसर्ग टळू शकतो. अधिक माहिती साठी आपल्या डॉक्टरांची त्याबद्दल चर्चा करा.

## प्रश्न (९)

### क्रॅनबेरीचा रस किंवा प्रोबायोटिक्स वारंवार होणाऱ्या लघवी संसर्ग कमी करतात का?

क्रॅनबेरीचा रस उत्पादनांचा योग्य डोस वापर केलास सामान्य मूत्रमार्ग असलेल्या मुलांमध्ये लघवीतील जंतुसंसर्ग टाळता येऊ शकतो असे पुरावे आहेत. तथापि क्रॅनबेरी रस उत्पादने सहज उपलब्ध नाहीत. तुम्ही तुमच्या डॉक्टरांशी याबाबत चर्चा केल्यास उत्तम.

यूटीआय रोखण्यासाठी प्रोबायोटिकचा वापर अनुकूल आहे असा कोणताही पुरावा नाही.

## प्रश्न (१०)

### वारंवार होणाऱ्या लघवीच्या जंतू संसर्गामुळे माझ्या मुलाची मूत्रपिंडे खराब किंवा निकामीहोतील का? डॉक्टरांकडे कोणता फॉलोअप आवश्यक आहे?

वारंवार होणाऱ्या लघवीच्या जंतू संसर्गामुळे मूत्रपिंड निकामी होण्याची शक्यता खूपच कमी असते. तथापि वारंवार होणाऱ्या संसर्गामुळे मूत्रपिंडाला इजा होऊ शकते आणि व्रण पडू शकतात. या डागांमुळे उच्च रक्तदाब आणि नंतर लघवीतून प्रथिने वाया जाऊ शकतात. ज्या मुलाला वरचेवर लघवीतील जंतुसंसर्ग होत आहे त्याने त्याच्या किंवा तिच्या डॉक्टरांपाशी जाऊन उच्च रक्तदाब मूत्रपिंडाची कार्यक्षमता आणि लघवीतून प्रथिने वाया जाणे याबाबत योग्य ती तपासणी करून घेण्याचा सल्ला दिला जातो वारंवार लघवी जंतू संसर्ग असलेल्या मुलाने पुढील दुष्परिणाम टाळण्यासाठी डॉक्टरांकडे उपचार घेणे गरजेचे आहे. या व्यतिरिक्त बीबीडी (मूत्राशय आणि आतड्याचे बिघडलेले कार्य) आढळल्यास आणि मूत्रमार्गावर कोणतीही शस्त्रक्रिया केली असल्यास शल्यचिकीत्सकाकडे फॉलोअप ठेवणे आवश्यक आहे.